# <u>संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ</u>

क्र.संगाबाअवि-३/सपमुमं/१६०/२०२५
दिनांक : ०७ / ०४ / २०२५

प्रति,

प्राचार्य/विभाग प्रमुख,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/
संबंधीत विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : Environmental Studies या विषयाच्या परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत उन्हाळी-२०२५ परीक्षा.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संबंधीत परीक्षांचे अध्यादेशातील तरतुदीनुसार ज्या परीक्षांना **Environmental Studies** या विषयाची परीक्षा देणे आवश्यक आहे अशा परीक्षेस पात्र असलेल्या व परीक्षा आवेदनपत्र भरलेल्या **उन्हाळी-२०२५ मध्ये प्रवेशित होणाऱ्या सत्र/सीजीएस/सीबीएसएस पद्धतीमधील विद्यार्थ्यांची (विधी व बी.व्होकसह) लेखी परीक्षा महाविद्यालयाच्या स्तरावर खाली नमूद तारीख, दिवस व वेळेमध्ये विद्यापीठाद्वारे पुरविण्यात येणाया प्रश्नपत्रिकांनुसार होईल.**

## <u>वेळापत्रक</u>

| विषय | परीक्षेची दिनांक व दिवस | वेळ |
|---|---|---|
| **Environmental Studies** | **सोमवार, दिनांक १६-०६-२०२५** | **दुपारी २.०० ते ०५.००** |

कृपया उपरोक्त परीक्षेच्या सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना Environmental Studies या आवश्यक विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या वेळापत्रकाची माहीती देण्यात यावी, ही विनंती.

सत्र/सीजीएस (सीबीसीएस लागू होण्याच्या पूर्वीचे विद्यार्थी) पद्धतीच्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा संचालनानंतरची पुढील कार्यवाही (प्रचलित पद्धतीने) अध्यादेश क्रमांक ४२/२००५ मधील तरतूदीनुसार महाविद्यालयांनी करावी.

(**टिप :** (१) शैक्षणिक सत्र २०२३-२४ पासून **सत्र-४ ला नवीन सी.बी.सी.एस. पद्धतीमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाची** उन्हाळी-२०२५ ची लेखी परीक्षा संबंधीत परीक्षांच्या निदेशातील तरतूदींच्या अनुषंगाने संबंधीत अभ्यासक्रमांच्या सत्र-४ च्या वेळापत्रकात दर्शविल्यानुसार खालील बाबींचे अनुषंगाने होईल.

i. सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमांच्या पर्यावरणशास्त्र विषयाची परीक्षा ह्या संबंधीत अभ्यासक्रमांच्या निदेशानुसार संचालित करण्यात येत आहेत.
ii. सदर परीक्षा ह्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांवर विद्यापीठामार्फत पुरविण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकांनुसार घेण्यात येईल.
iii. सदर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे.
iv. सी.बी.सी.एस.पद्धतीमधील पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिका परीक्षा केंद्रांनी इतर विषयांच्या उत्तरपत्रिकांप्रमाणेच विद्यापीठात जमा करावयाच्या आहेत. सदर विषयांचे मुल्यांकन विद्यापीठाच्या केंद्रीय मुल्यांकन कार्यक्रम केंद्रात होईल.

(कृ.मा.प.)

(२) अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील **बी.आर्च. सत्र-४ (सी.बी.सी.एस.) पद्धतीमधील** परीक्षा योजनेत पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाचा विषय दर्शविला नसल्यामुळे सदर विषयाची उन्हाळी-२०२५ ची लेखी परीक्षा अभियांत्रिकी व तांत्रिकी शाखेतील इतर अभ्यासक्रमांच्या वेळापत्रकात दर्शविल्यानुसार **दिनांक ३०-०५-२०२५ रोजी सकाळी ९.०० ते १२.०० यावेळेत** होईल. परीक्षा संचालनानंतरची पुढील कार्यवाही अध्यादेश क्रमांक ४२/२००५ मधील तरतूदीनुसार महाविद्यालयाने करावी.

आपला,

(डॉ.नितीन अं. कोळी)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रति,**

१) प्रमुख, संगणक केंद्र,
उपरोक्त वेळापत्रकातील दुरुस्ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस्तव.

**प्रतिलिपीः माहीती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

२) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३) मुख्य अधिकारी, केंद्रीय मुल्यांकन कार्यक्रम केंद्र
४) उपकुलसचिव (परीक्षा-चौकशी)
५) सहा. कुलसचिव (सारणी)
६) सहा.कुलसचिव (परीक्षा)
७) सहा.कुलसचिव (गोपनीय )

**प्रत सविनय अग्रेषित**

मा.सदस्य, व्यवस्थापन परिषद / परीक्षा व मूल्यमापन मंडळ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
मा. प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.